## • स्पर्धेची वैशिष्टये •

- गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या संघास फिरता पद्मश्री विखे पाटील करंडक आणि २१००/- रु. रोख देण्यात येईल.
- गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या वरिष्ठ गटातील पहिल्या तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना अनुक्रमे ७१०१/- रु., ५१०१/- रु., ३१०१/- रु. रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात येईल.
- कनिष्ठ महाविद्यालय गटातील गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना अनुक्रमे २५०१/- रु., २१०१/- रु., १५०१/- रु. अशी पारितोषिके देण्यात येईल.
- गुणानुक्रमे पहिल्या दहा संघांना एका बाजूचा एस.टी./रेल्वे प्रवास खर्च देण्यात येईल.
- सर्व स्पर्धकांची भोजन व निवास व्यवस्था मोफत करण्यात येईल.
- विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल.

**सहभागी स्पर्धकांना दि. ०८ जानेवारी २०१९ रोजी सायं. ५.३० नंतर महाविद्यालयाच्या बसने मोफत शिर्डी येथे साई दर्शनाची व्यवस्था केलेली आहे.**

**प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख**
सोमवार दि. ०७ जानेवारी २०१९

**स्पर्धा तारीख**
मंगळवार दि. ०८ व बुधवार दि. ०९ जानेवारी २०१९

**उद्घाटन समारंभ**
मंगळवार दि. ०८ जानेवारी २०१९
सकाळी १०.०० वा.

**पारितोषिक वितरण समारंभ**
बुधवार दि. ०९ जानेवारी २०१९
दुपारी ३.३० वा.

**अधिक माहितीसाठी संपर्क**
**Website :** www.pravarapvpcollege.org.in
Email : pvpcollege@gmail.com

**• स्पर्धेचे ठिकाण •**
**खासदार श्री. बाळासाहेब विखे पाटील बहुउद्देशीय सभागृह, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर.**

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे



# पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर

मु. पो. लोणी खुर्द-४१३ ७१३, ता. राहाता, जि. अ. नगर (महाराष्ट्र)

(नॅक पुनर्मूल्यांकित A ग्रेड (CGPA 3.61), उत्कृष्ट क्षमताशील, आय.एस.ओ. ९००१:२००८ मानांकित, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय व तारांकित दर्जा प्राप्त महाविद्यालय)

द्वारा आयोजित

## सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

# रौप्य करंडक वादविवाद स्पर्धा

## सन २०१८-१९ (वर्ष ३८ वे)

## मंगळवार दि. ०८ व बुधवार दि. ०९ जानेवारी २०१९

वादविवादाचा प्रस्ताव

## "आजची शिक्षण पध्दती बेरोजगारी दूर करण्यास समर्थ आहे!"



मा.प्राचार्य, स.न.वि.वि.

सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन रौप्यकरंडक वादविवाद स्पर्धा ही पद्मश्रींच्या उत्तुंग कर्तृत्वाची स्मृती म्हणून महाराष्ट्रात ओळखली जाते. गेल्या ३७ वर्षापासून तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा विविध क्षेत्रातील ज्वलंत विषयांवर विचारमंथन घडवून आणण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वैचारिक व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्यांच्यातील सुप्त वक्तृत्त्व गुणांना चालना मिळावी म्हणून ही स्पर्धा दरवर्षी यशस्वीपणे आयोजित केली जाते .

शिक्षण हे मानवी जीवनाच्या विकासाला विधायक आकार देण्यास महत्त्वाची भूमिका निभावते. 'शिक्षण' हा शब्द आधुनिक काळात प्रचलित झालेला असून; प्राचीन काळात यालाच ज्ञानार्जन असे संबोधले जात होते . अर्थात त्याकाळी ज्ञान मिळविणे यामागील मुख्य हेतू हा आध्यात्मिक स्वरूपाचा होता. शिक्षणामुळेच मानवाचे अस्तित्त्व निर्माण झाले. प्रगतीच्या वाटा खुल्या झाल्या. माणूस तंत्र–यंत्र आणि संसाधन यात खूप पारंगत होत गेला. आज तो एका जागेवर बसून सातासमुद्रापार संपर्क साधू शकतो . जगात कुठेही काहीही झाले तरी ते तो घरबसल्या पाहू शकतो . कोणत्याही गोष्टीबद्दल तो इंटरनेटच्या माध्यमातून माहिती घेऊ शकतो . हे त्याला केवळ शिक्षणामुळेच शक्य झाले आहे. याच शिक्षणाने कधी काळी निमकी आणि दिडकी कमावणाऱ्या हातांमध्ये आज लाखो रुपये कमवण्याची ताकद दिली. शिक्षित झालेला तरुण विशिष्ट प्रकारची कौशल्ये आत्मसात करू लागला. व त्याचे उपयोजन करून काही अर्थार्जनही करू लागला . अर्थप्राप्ती ही त्यामागील मुख्य प्रेरणा होती . या अर्थप्राप्तीतून तो भौतिक सुविधा उपभोगू लागला . जसजसा भारतीय जीवनाचा कणा भौतिक जीवनाकडे सरकू लागला. तसतसे आधुनिक शिक्षण पद्धतीला अधिकाधिक महत्व प्राप्त होऊ लागले. त्यामुळे ज्याच्याकडे उच्चप्रतीचे कौशल्ये आहे . त्याला मान– सन्मान तर मिळू लागलाच, त्याबरोबरच त्याच्या हातामध्ये पैसाही खेळू लागला.

एक काळ असा होता की ज्या काळात आठरा पगड जाती आणि बारा बलुतेदारी असताना सुद्धा लोक बेरोजगार नव्हते कारण त्यांच्याकडे चौदा विद्या आणि चौसष्ट कला होत्या. मग त्या कला आज लुप्त होत चालल्या आहेत का? की त्यापेक्षा सुद्धा जास्त संधी आज आमच्याकडे उपलब्ध आहेत का ? पण जागतिकीकरणाच्या, औद्योगीकरणाच्या आणि पैसे कमाविण्याच्या नादात आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतोय की काय ?

तसेच एका बाजूला शिक्षण धोरणांची वाढती संख्या आणि दुसऱ्या बाजूला महागडे होत जाणारे शिक्षण, अपुऱ्या पायाभूत सुविधा, व्यापारी आणि धंदेवाईक दृष्टीकोणाचा वाढता प्रभाव, गुणात्मकतेऐवजी केवळ संख्यात्मक वाढीवर दिला जाणारा भर, नैतिक जबाबदारीची कमी होत जाणारी जाणीव , शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधील वाढत जाणारी दरी ही सगळी परिस्थिती एका बाजूला आणि दुसरीकडे आज २१ व्या शतकात त्याच शिक्षणव्यवस्थेत शिकणारे व कौशल्याधारित शिक्षणाचा अभाव असल्यामुळे तरुणांचे पदवी घेऊन लोंढेच्या लोंढे निर्माण होत आहेत . आजचे तरुण उच्च पदवी घेऊन पदोपदी नोकरी मिळविण्यासाठी झगडत आहेत . उच्च शिक्षण घेऊनही आजचा तरुण स्वत:च्या पायावर उभा राहू शकत नसेल तर यात चूक नेमकी कोणाची ? शिक्षण घेणाऱ्याची , देणाऱ्यांची की ; शिक्षण व्यवस्थेची ?

या सर्व प्रश्नांच्या अनुषंगाने साधक –बाधक चर्चा करण्यासाठी आम्ही आपल्यासमोर

**''आजची शिक्षण पध्दती बेरोजगारी दूर करण्यास समर्थ आहे!''**

हा प्रस्ताव वादविवादासाठी ठेवत आहोत .

महाविद्यालयीन युवकांना वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही हे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. तरी कृपया आपल्या महाविद्यालयाचा संघ पाठवून आम्हांस सहकार्य करावे.

## ● स्पर्धेचे नियम व अटी ●

१) महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयातील कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल.

२) या स्पर्धेतील सर्व भाषणे मराठी भाषेतून होतील.

३) स्पर्धेतील स्पर्धकांना आपली बाजू मांडण्यासाठी ६+२=८ मिनिटे वेळ राहील.

४) बाहेर गावावरुन येणाऱ्या स्पर्धकांसाठी भोजन व निवास व्यवस्था मोफत करण्यात येईल.

५) प्रत्येक महाविद्यालयातून कनिष्ठ व वरिष्ठ असे दोन संघ पाठविता येतील.

६) या स्पर्धेत प्रथम क्रमांकाने यशस्वी झालेल्या स्पर्धकास पुन्हा या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

७) रौप्य करंडक विजेत्या महाविद्यालयास हा करंडक पुढील वर्षी स्पर्धेपूर्वी एक महिना अगोदर मा. प्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर यांचेकडे स्वखर्चाने सुस्थितीत परत करावा लागेल.

८) स्पर्धेसाठी भरावयाच्या प्रवेश अर्जात स्पर्धक विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव, वर्ग, विद्याशाखा, जन्मदिनांक, वय आणि इतर आवश्यक माहिती द्यावी. स्पर्धकांचे वय २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

९) स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचे अर्ज त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत पाठवावेत.

१०) काही अपरिहार्य कारणामुळे स्पर्धेच्या तारखेत किंवा वेळेत बदल झाल्यास तसे संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना योग्यवेळी कळविण्यात येईल. वैयक्तिकपणे स्पर्धकास कळविले जाणार नाही. या संबंधीची चौकशी स्पर्धकाने आपल्या महाविद्यालयाच्या कार्यालयात करावी.

११) परीक्षकांचा आणि संयोजन समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१२) उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धेबाबतचा निर्णय संयोजन समितीने राखून ठेवलेला आहे.

१३) प्रत्येक संघास प्रवेश फी रु. १००/– (शंभर) भरावी लागेल.

## ● संयोजन समिती ●

| | |
|---|---|
| डॉ. शांताराम चौधरी | डॉ. प्रदीप दिघे |
| कार्याध्यक्ष | प्राचार्य |
| प्रा.यु.ओ. येवले | डॉ.ए.जी.गाढवे, |
| प्रा.डी.के.खेमनर | डॉ.व्ही.डी.मुरादे |

डॉ.बी.डी.रणपिसे